दै. प्रजावाणी दि. ०७/०४/२०२२

दै. प्रजावाणी दि-07/04/2022

# एटीएमचे ३१ लाख लुटणारे तीन दरोडेखोर गजाआड

## अर्धापूर पोलिसांची कामगिरी

**नागोराव भांगे**

अर्धापूर, दि. ६ : येथील बसवेश्वर चौकातील एसबीआय बँकेचे एटीएम फोडून ३१ लाख रुपये घेऊन दरोडेखोर पसार झाले होते. या घटनेतील दरोडेखोर हरियाणा येथील असून अर्धापूर पोलीसांनी त्यांना गजाआड केले आहे.



नांदेड-नागपूर राष्ट्रीय महामार्गावर अर्धापूर शहरातील बसवेश्वर चौकात एसबीआय बँकेचे एटीएम मुख्य रस्त्यावर आहे. दि.२९ जुलै २०२१ रोजी पहाटे चारच्या सुमारास चोरट्यांनी गॅस कटरच्या साहाय्याने पंधरा मिनिटांत एटीएममधील ३१ लाख ७ हजार रुपयांची रक्कम घेऊन पसार झाले होते. या प्रकरणी अर्धापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीस निरीक्षक अशोक जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू होता. नऊ महिन्यांनी एटीएम चोरी प्रकरणातील आरोपी पोलिसांच्या हाती लागले आहेत. पोलिसांनी त्यांच्या मुसक्या आवळल्या आहेत.

गॅस कटरच्या सहाय्याने चोरी करणारी परप्रांतीय टोळीतील हरियाणा राज्यातील आहे. या प्रकरणी इर्शाद आसमोहम्मद मेवाती (वय ३६ वर्षे, रा. बुराका थाना हथिन जि. पलवल), सलीम हसन मोहम्मद (वय २६, रा. मेवाती जुना मोहल्ला, जवळ गाव, उटावड, ठाणा उटावडा तहसील, जि. पलवल) मुस्ताक इस्लाम मेवाती (वय ४३ रा. अंधाका ठाणा, नुहसदर ता.जि.नुह) या तिघांना अटक करण्यात आली आहे. त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या प्रकरणी पोलीस निरीक्षक अशोक जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक महम्मद तय्यब, सतीश लहानकर, संदीप पाटील, कल्याण पांडे, महेंद्र डांगे यांनी आरोपींना मध्यप्रदेश येथून आटक केली. या गुन्ह्यातील आरोपींना तीन दिवसाची पोलीस कोठडी मिळाली असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. यावेळी राजेश घुन्नर, चाटे, रामराव घुले हे तपास कार्यात मदत करत आहेत.